# शेतीव्यवस्था आणि स्त्रिया

[एस्थर बोझरप यांचे 'वूमन्स रोल इन इकॉनॉमिक डेव्हलपमेंट' (१९७०) हे पुस्तक म्हणजे अविकसित व विकसनशील देशांमध्ये आर्थिक प्रगतीच्या ओघात स्त्रियांवर काय परिणाम होतात याचा उत्कृष्ट आढावा आहे. ग्रामीण व शहरी विभागांमध्ये स्त्रीचा अर्थकारणातील सहभाग कसकसा बदलत जातो व त्याचा तिच्या सामाजिक स्थानावर काय परिणाम होतो याचे विवेचन यात केलेले आहे. हा लेख त्या पुस्तकावर आधारित आहे.]

अगदी प्राथमिक अवस्थेतही प्रत्येक समाजात वय आणि स्त्री-पुरुष भेदानुसार कुटुंबातील काम विभागले जाते. प्रत्येक समाजात कामाची विभागणी जरी वेगवेगळ्या पद्धतीने केली जात असली तरी प्रत्येक समाजाला आपलीच पद्धत नैसर्गिक – जात्याच स्त्री-पुरुष भेदावर आधारलेली–वाटत असते. परंतु वेगवेगळ्या शेतीप्रधान समाजव्यवस्थांचा अभ्यास केल्यास अनेक वेगवेगळ्या पद्धती अस्तित्वात असलेल्या दिसतात. काही समाजात स्त्रियांचा शेतकामात फार मोठा वाटा असतो; तर काही समाजात स्त्रिया शेतीपासून बहुतांशी दूरच राहताना दिसतात. याला कारण त्या त्या समाजातील जमिनीचे मालकीसंबंध व श्रमविभागणी. या दोन गोष्टींवर स्त्रियाचे त्या त्या समाजातील स्थानही अवलंबून असते. या लेखात आफ्रिकेतील पारंपारिक शेतीव्यवस्था, त्यातील बदल व काही ठिकाणी आशियाशी तुलना यांची चर्चा केली आहे. त्यातून वरील मुद्दे स्पष्ट व्हावेत.

## भटक्या शेतीत स्त्रियांचे स्थान

आफ्रिकेत स्त्रीप्रधान शेती अजूनही बऱ्याच ठिकाणी दिसते. ज्या काळात आफ्रिकन जमाती एका ठिकाणी शेती करून ती जमीन नापीक झाल्यावर दुसऱ्या ठिकाणी जात व तेथे शेती सुरू करीत, त्या पद्धतीत स्त्रियांचा फार मोठा वाटा होता. फक्त नवीन जागेवरील झाडे तोडण्याचे काम पुरुष करीत. तेही बहुधा १५ ते १८ वयोगटातील पुरुषांकडेच असे. झाडे हलवून जाळणे, जमीन साफ करणे, जमिनीतील गवत काढणे, पेरणी, कापणी, धान्य शेतातून घरी नेणे, इत्यादी सर्व कामे स्त्रियाच करीत. याला अपवाद म्हणून काही ठिकाणी मात्र पुरुषांची अधिक मदत होत असे; तर काही ठिकाणी शेतीची बरीचशी कामे पुरुषच करीत असतात.

पूर्ण स्त्रीप्रधान शेती–ज्यात पुरुष फक्त झाडे तोडण्याचे काम करीत – सुमारे ५० वर्षापूर्वी कांगो, पूर्व व आग्नेय आफ्रिकेचा बराच मोठा भाग व पश्चिम आफ्रिका येथे अस्तित्वात होती. सहारा वाळवंटाच्या दक्षिणेकडे मात्र स्त्रियांना पुरुषांची अधिक मदत होत असे.

बहुतकरून असे समजले जाते की शेतीच्या पारंपारिक पद्धती पिढ्यानपिढ्या तशाच चालत रहातात, व त्यात श्रमविभागणी व तंत्र या दृष्टीने काहीच बदल होत नाहीत. परंतु ऐतिहासिक दृष्ट्या हे चूक आहे. स्त्रीप्रधान शेतीव्यवस्था असलेल्या जमाती पुरुषप्रधान शेतीव्यवस्थेकडे वळलेल्या दिसतात. तसेच, पण कमी प्रमाणात, पुरुषप्रधान शेतीव्यवस्था असणारे समाज स्त्रीप्रधान शेतीकडे वळलेले दिसतात. हे बदल बहुधा लोकसंख्या व शेतीच्या तंत्रातील बदलांशी संबंधित असलेले दिसतात. लोकसंख्या जसजशी वाढू लागते, तसतसा जंगलांचा प्रदेश कमी होऊ लागतो. त्यामुळे शिकार व झाडे तोडणे ही पुरुषी कामे कमी प्रमाणात उपलब्ध होतात. त्याचबरोबर भटक्या शेतीलाही आळा बसतो. आहे तीच जमीन कमीत कमी काळ पडित ठेवून त्यात जास्तीत जास्त उत्पादन काढण्याचा प्रयत्न करावा लागतो. या परिस्थितीत शेतीची पेरणीपूर्व मशागत पुरुषांकडे जाणे स्वाभाविक आहे. त्यामुळे शेतीतील स्त्रियांची काही कामे पुरुषांच्या हातात गेली. याउलट काही ठिकाणी वाढत्या लोकसंख्येमुळे पुरुष रोजगारासाठी स्थलांतर करतात व ते पूर्वी करत असलेली कामे स्त्रियांना करावी लागतात. आफ्रिकेमध्ये अनेक ठिकाणी या दोन्ही प्रकारचे बदल झालेले दिसतात.

याखेरीज युरोपियन वसाहतींमुळेही आफ्रिकेत शेतीव्यवस्थेत बदल झाला. पुरुषप्रधान शेतीशीच परिचित असलेल्या युरोपियनांना शेतीत काहीच काम न करणारे

आफ्रिकन पुरुष आळशी वाटले नाहीत तरच नवल! युरोपियनांनी आफ्रिकन पुरुषांना निर्यातीसाठी व्यापारी पिके उत्पादन करण्यासाठी प्रवृत्त करण्याचा प्रयत्न केला. यामुळे पुरुषांचा शेतीतील सहभाग थोडा तरी वाढला. मात्र त्याचबरोबर अनेक ठिकाणी गोऱ्या कंत्राटदारांनी व मळेवाल्यांनी कधी कधी जबरदस्तीनेही अनेक आफ्रिकन पुरुषांना बांधकाम, खाणी मळे यात भरती केल्याने शेती पूर्णतः स्त्रियांच्याच अंगावर पडली.

आफ्रिकेच्या वेगवेगळ्या भागात केलेल्या पहाणीवरून लक्षात येते की अजूनही स्त्रिया पुरुषांपेक्षा अधिक वेळ शेतात काम करतात व त्यांची संख्या शेतीत अधिक आहे. गँबिया, युगांडा यांमध्ये काही ठिकाणी पुरुष आठवड्याला १० तासापेक्षाही कमी वेळ, तर कांगो, युगांडा, केनिया मध्ये काही ठिकाणी स्त्रिया आठवड्याला २५ तास शेतीचे काम करतात. सरासरी स्त्रिया शेतीचे ५० टक्केहूनही अधिक काम करतात. काही ठिकाणी तर हे प्रमाण ७० ते ८० टक्के आहे. या सर्व ठिकाणी व्यापारी पिकेही प्रमाणात्र घेतली जातात. याशिवाय पूर्वीपेक्षा स्त्रियांचे शेतीतील प्रमाण वाढलेच आहे व ते आधुनिकीकरण झालेल्या जागीही दिसते. स्त्रीप्रधान शेतीव्यवस्था लॅटिन अमेरिका व आशिया येथेही काही ठिकाणी—विशेषतः आदिवासी भागात—अजूनही आढळते.

## नांगराची शेती व स्त्रिया

स्त्रीप्रधान शेती ही बहुधा भटक्या शेतीच्या अवस्थेत दिसून येते. जेथे शेतीसाठी नांगराचा उपयोग केला जातो व शेती कायम स्वरूपाची असते तेथे श्रमविभागणी वेगळ्या प्रकारे होताना दिसते. नांगरणी व मशागत जनावरांच्या सहाय्याने केली जाते व हे काम पुरुषाचे असते. स्त्रिया फक्त कापणी, जनावरांची काळजी घेणे इ. कामे करतात. काही वेळा तर त्या फक्त घरकामच करतात. याला अपवाद क्वचित सापडतात. उदा. द. आफ्रिकेत बांट जमातीत स्त्रियाच नांगर चालवतात. पण हे क्वचितच. नांगर, पाळीव जनावरे यामुळे पुरुषांचे काम वाढत असल्याने बरेचदा भटक्या शेतीकडून नांगराच्या शेतीकडे वळण्यास पुरुषांची प्रतिकूलता दिसून येते. भटक्या शेतीसाठी जोपर्यंत पुरेशी जमीन उपलब्ध आहे व शिकार व मासेमारीपासून जोपर्यंत प्रथिनांचा पुरवठा होऊ शकतो, तोपर्यंत भटकी शेती सोडण्यास आफ्रिकन पुरुषांनी अनिच्छाच दाखवली आहे

आपण पाहिले की लोकसंख्येची घनता वाढली की शेतकरी कुटुंबे भटक्या शेताकडून नांगराच्या शेतीकडे वळतात आणि त्यामुळे पुरुषाचे काम वाढून स्त्रीचे काम कमी होते. जोपर्यंत नांगराची शेतीही पाणीपुरवठ्याविना मोठ्या प्रमाणात करणे शक्य होण्याइतकी लोकसंख्येची घनता कमी रहाते, तोपर्यंतच स्त्रियांना फारसे काम नसते—गवत काढणे, जनावरांचा चारा आणणे इ. कामे कमी प्रमाणात असतात. परंतु जेव्हा लोकसंख्येची घनता फार मोठ्या प्रमाणात वाढून एका ठराविक जमिनीच्या तुकड्यापासून पुरेसे उत्पन्न मिळण्यासाठी श्रमप्रधान अशी पिके व तंत्रे वापरण्याची गरज भासते तेव्हा परत स्त्रियांचे काम वाढते. पाणीपुरवठ्याबरोबरच गवत काढण्याचे व भाताची लावणी करण्याचे काम वाढते. दाट लोकवस्तीच्या प्रदेशात स्त्रियांचे शेतीतील काम कसे वाढते याची उदाहरणे इजिप्त व चीन येथे सापडतात. चीनमध्ये मुख्यतः पुरुषप्रधान शेतीव्यवस्था असूनही अगदी दाट लोकवस्तीच्या भागात भाताची वर्षातून दोन पिके घेतली जातात व तेथे स्त्रिया शेतीतील कामाचा फार मोठा वाटा उचलतात.

## बहुपत्नित्वाचे अर्थकारण

आफ्रिकेतील स्त्रियांचा शेतीतील सहभाग पाहिल्यानंतर हे सहज लक्षात येते की जितक्या अधिक स्त्रिया कुटुंबात असतील तितकी अधिक जमीन लागवडीखाली आणता येते व उत्पन्न वाढवता येते. याला महत्त्वाचे कारण असे की आफ्रिकेत बऱ्याच ठिकाणी आदिवासी जमातींचे जमीनविषयक नियम अजूनही अस्तित्वात आहेत. विशिष्ट जमिनीवर अधिकार असणाऱ्या जमातीमधील कोणत्याही व्यक्तीला अन्नउत्पादनासाठी व कधीकधी व्यापारी पिकांसाठीही शक्य तेवढी जमीन लागवडीखाली आणण्याचा हक्क असतो. त्यामुळे कुटुंबात जितक्या स्त्रिया अधिक तितकी शेती वाढवणे शक्य होते. व म्हणूनच एकाहून अधिक बायका करणे आर्थिक दृष्ट्या फायदेशीर ठरते. पूर्व आफ्रिकेत युगांडाच्या एका भागात केलेल्या पहाणीची आकडेवारी अशी आहे: एक पत्नी असलेल्या पुरुषांनी लागवड केलेली जमीन सरासरी १.६७ एकर, तर दोन बायका असलेल्यांनी लाग-

वढ केलेली जमीन सरासरी २.९४ एकर इतकी होती. अशा रीतीने पडित ठेवता येण्याइतकी जमीन जेथे उपलब्ध आहे तेथे वाढत्या शेतीसाठी बहुपत्नित्वाची प्रथा हा अतिशय महत्त्वाचा घटक ठरतो. अनेक बायका असल्यास शेतीसाठी मजूर लावण्याची गरजही भासत नाही. १९३० साली पश्चिम आफ्रिकेतील एका पहाणीत असे दिसले की कमीत कमी ४ बायका असल्या खेरीज चांगली शेती करता येत नाही असा समज ग्रामीण भागात रूढ होता. याच पहाणीत ८५२ घरांमध्ये नवरे व बायका यांचे प्रमाण १ : २.३ इतके असल्याचे दिसले. अजूनही बहुपत्नित्वाची प्रथा अनेक ठिकाणी आहे. एकूण विवाहित कुटुंबांपैकी सेनेगलमध्ये २३ %, नायजेरियात ६३ %, दक्षिण आफ्रिकेत १४% व युगांडात ४५ टक्के कुटुंबात बहुपत्नित्व आहे. अनेक बायका करण्यामागे केवळ शेती वाढवता येणे एवढा एकच उद्देश नसून कित्येकदा पुरुष स्वतःचे काम करवण्यासाठी दुसरे लग्न करतात.

अर्थात अनेक लग्ने करण्यात वंशाची वाढ हाही एक उद्देश असतो. नायजेरियातील योरुबा जमातीत दोन कारणे प्रामुख्याने दिसून आली. एक म्हणजे अनेक बायका करण्याने खर्च जेवढा वाढतो त्यापेक्षा कितीतरी पटीने उत्पन्न वाढते; व दुसरे, अनेक मुले, नातवंडे यांनी कुटुंबाची प्रतिष्ठा व सामाजिक स्थान उंचावते.

बहुपत्नित्वात अर्थात पतीपत्नीतील आर्थिक संबंध अगदी निराळे असतात. योरुबा जमातीच्या एका पहाणीत फक्त २% स्त्रिया फक्त घरकाम करत होत्या व फक्त ५% स्त्रियांना आवश्यक त्या सर्व गोष्टी नवऱ्याकडून पुरवल्या जात होत्या असे दिसले. इतर सर्व स्त्रिया शेती, उद्योगधंदे यात गुंतलेल्या होत्या. या सर्वांना कुटुंबाच्या अन्नवस्त्राचा काही भार उचलावा लागत होता. २० % स्त्रियांना नवऱ्याकडून काहीच मिळत नसल्याचे कुटुंबाचा सर्व भार उचलावा लागत होता. परंतु त्या स्वतःच्या कामाखेरीज नवऱ्याच्या शेतावरही काम करत होत्या. पश्चिम आफ्रिका व नायजेरियाचा उत्तर विभाग येथेही अनेक ठिकाणी स्त्रिया कुटुंबाची पूर्ण जबाबदारी घेताना दिसतात.

ज्या कुटुंबव्यवस्थेत स्त्रियांना कुटुंबासाठी अन्नउत्पादन व शिवाय नवऱ्यासाठी घरकाम करावे लागते, अशा ठिकाणी स्त्रियांनाही नवऱ्याची अनेक लग्ने पसंत पडणे स्वाभाविक आहे. कारण बायकांच्या वाढत्या संख्येच्या प्रमाणात स्त्रीची आर्थिक जबाबदारी व घरकामाचे कष्ट दोन्ही कमी होत जातात. आयव्हरी कोस्ट येथे केलेल्या पहाणीनुसार ८५ टक्के स्त्रियांनी बहुपत्नित्वाची प्रथा अधिक पसंत असल्याचे सांगितले; त्यासाठी त्यांनी दिलेली कारणे घरकाम व आर्थिक बोजा ही दोन्ही होती. यामुळेच आधुनिकतेचा भाग म्हणून एकपत्नित्वाचा प्रचार करणाऱ्या सुशिक्षित आफ्रिकन स्त्रियांना बहुसंख्य स्त्रियांचा पाठिंबा मिळू शकला नाही. अनेक वेळी तर पहिली बायकोच नवऱ्याने दुसरे लग्न करण्यासाठी पुढाकार घेताना दिसते.

अशा कुटुंबात बहुधा नंतरच्या बायकांचे स्थान पहिल्या बायकोच्या मदतनीस किंवा नोकर असे असते. बरेच वेळा त्यांचे स्थान शेतमजुरांसारखेच असते. सुदानपासून नायजेरिया, आयव्हरी कोस्टपर्यंत अनेक ठिकाणी असे दिसते की कुटुंबातील पुरुष शेतीत जेथे पुरुषाच्या शक्तीची गरज असते तेथे मजूर लावतो व हे पुरुषमजूर व कुटुंबातील स्त्रिया मिळून शेती करतात त्यांच्यावर फक्त देखरेख करण्याचे काम कुटुंबातील पुरुष करतो. अशा वेळी मजुरांची उपलब्धता हा बहुपत्नित्वाला पोषक घटक ठरतो. कारण लिंगभेदानुसार कामविभागणी न बदलताही कुटुंबाची शेती वाढवता येते. काही ठिकाणी तर असे दिसले की अनेक बायका असलेले शेतकरी बायकांकडून पुरुष-मजुरांना जाळ्यात पकडत व त्यांच्याकडून मजुरी न देता काम करून घेत.

पहिल्या बायकोची मदतनीस किंवा नोकर एवढेच नंतरच्या बायकांचे स्थान असण्याचे एक कारण म्हणजे बहुपत्नित्वाच्या चालीचा व गुलामगिरीच्या प्रथेचा संबंध. अगदी आतापर्यंत आफ्रिकेत घरात गुलाम स्त्रिया ठेवण्याची पद्धत होती. गुलामगिरीवर युरोपियन सत्तेने कायदेशीर बंदी घातल्यावर गुलाम ठेवण्याऐवजी अशा स्त्रियांशी लग्न करण्याकडे कल वाढला. १९५९ मध्ये प्रसिद्ध झालेल्या एका प्रबंधात आयव्हरी कोस्ट येथे पुरुष आपल्या मुली व बायका कर्ज भागवण्यासाठी गहाण ठेवत असल्याचे म्हटले आहे.

मुस्लिम धर्मात सर्व बायकांना समान वागणूक देणे व त्यांचा भार उचलणे ही पुरुषावर बंधने असल्याने बऱ्याच आफ्रिकन स्त्रिया मुस्लिम पुरुषाशी लग्न करणे पसंत करतात.

नत्वाचे परिणाम म्हणून विवाहाच्या वेळी स्त्रीला पैसे (देज) देण्याची पद्धत, विवाह-संबंध व वेश्याव्यवसाय यांची वाढ या तीन दिसतात. एका पुरुषाला अनेक बायका असल्याने पुरुषांना अविवाहित रहावे लागते किंवा दशोरा रहावे लागते. त्यामुळे वेश्याव्यवसायाची वाढ होते. स्त्रीने नवऱ्याकडून घेतलेली देजाची रक्कम परत केली तर ती नवऱ्याला सोडून जाऊ शकते. स्त्रियांना शेतीत सतत राबावे लागते अशा ठिकाणी स्त्रियांना अनेक बायका असलेला, वयाने बराच असा नवरा सोडून जावासा वाटणे स्वाभाविक तशी भीतीही या नवऱ्यांना वाटते. त्यामुळे ची रक्कम नंतर या स्त्रियांना परत करता येऊ इतकी जास्त ठेवणे व त्यांना पैशाच्या स्वरुपात उत्पन्नच मिळू नये अशी खबरदारी घेणे या गोष्टी आफ्रिकेत दिसतात.

## शेतीव्यवस्था व स्त्रियांचे सामाजिक स्थान

जेथे भटकी शेती संपून कायम स्वरुपाची शेती सुरू झाली आहे अशा ठिकाणी बहुपत्निवाला उत्तेजन देणारी आर्थिक कारणे नसल्याने ती प्रथा जवळ जवळ नष्ट झालेली दिसते. या शेतीत पुरुषावर बहुतेक सर्व जबाबदारी पडत असल्याने एकाहून अधिक बायका करण्याने आर्थिक बोजाच वाढतो. अनेक लग्ने करण्याचे प्रमाण इजिप्तमध्ये ४% हून कमी, अल्जीरियात ९% व पाकिस्तान व इंडोनेशियात ३% इतकेच आहे.

स्त्रियांचा शेतीतील सहभाग व लग्नातील देणे-घेणे यांचा उघडउघड संबंध आहे, हे दक्षिण व पूर्व आशियातील उदाहरणांवरून दिसून येते. ब्रह्मदेश, मलाया व लाओस येथे स्त्रिया शेतीची बहुतेक सारी कामे करताना दिसतात व तेथे लग्नात नवऱ्याने नवरीला देज देण्याची पद्धत रूढ आहे. हीच स्थिती भारतातील आदिवासी जमाती व जातीश्रेणीतील कनिष्ठ जाती—ज्यात स्त्रिया रोजगार करतात—यात दिसते. याउलट हिंदू समाजातील वरिष्ठ जातींमध्ये स्त्रियांचा शेतकामातील भाग अगदी कमी असून तेथे हुंडा देण्याची पद्धत आहे.

केवळ हुंडाच नव्हे, तर पडदा पाळण्याची पद्धतही वरच्या वर्गातील स्त्रियांची खूण समजली जाते. सुदानमधील सुशिक्षित स्त्रियाही शिक्षण संपल्यानंतर चार भिंतीआड राहू लागतात. अशा समाजात स्त्रियांचे स्थान अत्यंत परस्परविरोधी असल्याचे लक्षात येते. एकीकडे त्यांना घराच्या चार भिंतीआड एखाद्या मूल्यवान वस्तूप्रमाणे दडवून ठेवले जाते; परंतु दुसरीकडे त्या काम करून पैसे मिळवत नसल्याने व हुंडापद्धतीमुळे मुलीचा जन्म म्हणजे दुःखदायक गोष्ट मानली जाते. राजस्थानात पूर्वी मुलगी झाल्यास बालहत्या करण्याची पद्धत होती ती या दृष्टिकोनातूनच. आता ही प्रथा तक्या उघड स्वरुपात दिसत नसली तरी मुली आजारी पडल्यास त्यांच्याकडे दुर्लक्ष करणे, दूध मुलींसाठी चांगले नसते पण मुलांसाठी चांगले अशासारख्या समजुती, या व इतर मार्गाने स्त्रियांची संख्या आजही पुरुषांपेक्षा कमी राखली गेली आहे. ज्या ग्रामीण समाजात स्त्रिया अर्थार्जन करतात तेथे स्त्रीचे महत्त्व मिळवती व्यक्ती व पुढील पिढ्यांची आई असे दुहेरी असते. परंतु स्त्रिया जेथे फक्त घरकामच करतात अशा समाजात स्त्रीचे महत्त्व फक्त वंश वाढवणारी एवढेच रहाते मुले नसलेल्या त्यातही मुलगा नसलेल्या स्त्रीला अशा समाजात काहीच स्थान रहात नाही.

## स्त्रियांच्या खालावलेल्या दर्जाची कारणे

प्राथमिक अवस्थेतील स्त्री–पुरुषांच्या उत्पादनशक्तीतील फरक साधारणः त्यांच्या शारीरिक शक्तीतील फरकाच्या प्रमाणात असतो. परंतु जसजशी शेतीत तांत्रिक प्रगती होत जाते, तसतसा उत्पादनशक्तीतील हा फरक वाढत जातो. याचे प्रमुख कारण असे की शेतीतील नवीन तंत्रज्ञान व नवीन यंत्रे पुरुषवर्गच हस्तगत करतो. सर्व विकसनशील राष्ट्रात व बऱ्याचशा औद्योगीकरण झालेल्या देशातही शेतीतील साधी, सोपी कामे स्त्रिया तर अधिक सुधारित अशी जनावरे व यंत्रे वापरून करण्याची कामे पुरुष करताना दिसतात. विकसनशील देशांमध्ये स्त्रियांच्या खालावलेल्या उत्पादनशक्तीला युरोपियन शासक व त्यांचे सल्लागार जबाबदार आहेत. त्यांनी जेव्हा या देशांमध्ये व्यापारी पिकांची लागवड सुरू केली तेव्हा स्त्री–शेतकऱ्यांकडे त्यांनी पूर्ण दुर्लक्ष केले. युगांडात कापूस उत्पादन स्त्रियांनीच सुरू केले असूनही १९२३ साली तेथील युरोपियन शेतकी अधिकाऱ्यांनी हे काम स्त्रियांकडे सोपवणे योग्य नसल्याचे जाहीर केले. नंतरच्या १० वर्षात सर्व पुरुष तेथे कापूस व कॉफीचे उत्पादन करू लागलेले दिसले,

आणि या कामासाठी इतर जमातीतून ते मजूरही आणू लागले. जेथे जेथे स्त्रिया शेती करत होत्या तेथे तेथे युरोपियनांनी फक्त पुरुषांनाच नवे तंत्रज्ञान दिले. आफ्रिकेत वेगवेगळ्या ठिकाणी केलेल्या अभ्यासात याचे दुष्परिणाम दिसून आले. काही ठिकाणी तर चमत्कारिक प्रकार दिसला. उदाहरणार्थ, सेनेगलमध्ये तैवानच्या चिनी तंत्रज्ञानी देखील भातउत्पादनाची सुधारित तंत्रे फक्त पुरुषांना शिकविली. परंतु शेती स्त्रियाच करत राहिल्या व तंत्रज्ञान पुरुषांकडे असूनही त्यांनी शेतीत लक्ष न घातल्याने शेतीची अवस्था पूर्वीसारखीच राहिली.

युरोपियनांच्या अशा धोरणामुळे स्त्री–पुरुषांच्या उत्पादनशक्तीतील फरक वाढत गेला. त्यातच पुरुषांना जे तंत्रज्ञान दिले गेले ते व्यापारी पिकांसाठी. त्यामुळे पुरुष पैसे हातात येऊन शेतीत सुधारणा करू शकले. याउलट स्त्रिया कुटुंबासाठीच अन्नउत्पादन व तेही जुन्याच पद्धतीने करत राहिल्याने त्यांच्या हातात पैसे कधीच आले नाहीत. युरोपियनांच्या शिक्षण-प्रसाराच्या पद्धतीमुळेही स्त्रिया मागे राहिल्या. मुले शाळेत गेली, पण मुली घरीच राहिल्या. त्यामुळे एक सांस्कृतिक दरी दोघात तयार झाली. अज्ञान, परंपरा, अंधश्रद्धा ही सर्व जमातीची वैशिष्ट्ये नंतर स्त्रियांमध्येच अधिक प्रमाणात राहिली. त्यामुळेही शेतीचे नवे तंत्र पुरुषांना शिकविणे जास्त सोपे झाले.

शेतीत खाजगी मालकीची सुरुवात हेही स्त्रियांचा दर्जा खालावण्याचे एक महत्त्वाचे कारण आहे. आदिवासी जमातीत औपचारिक रित्या जरी जमातीच्या प्रमुखाच्या मालकीची जमीन असली तरी प्रत्येकाला शक्य तेवढी जमीन लागवडीखाली आणण्याचा हक्क आहे व हा हक्क स्त्रियाच अमलात आणतात. काही ठिकाणी जमिनीची मालकी पुरुषाकडे व पिकाची मालकी स्त्रीकडे असते. परंतु ही मालकी आपण सध्या ज्या अर्थाने हा शब्द वापरतो त्या अर्थाने नसते, तर केवळ औपचारिक रीतीने. जेव्हा सध्याच्या अर्थाने खाजगी मालकीची कल्पना अस्तित्वात येते, तेव्हा मात्र या स्त्रियांची परिस्थिती अवघड बनते. लोकसंख्येच्या वाढीमुळे किंवा व्यापारी पिकांच्या वाढत्या लागवडीमुळे जमीन दुर्मिळ बनते. तेव्हा जमिनीची विक्री, खंडाने देणे इ. प्रकार चालू होतात. तेव्हा मात्र जमिनीची मालकी पुरुषाची व पिकाची मालकी स्त्रीकडे इ. कल्पना स्त्रीच्या स्थानाला धोकादायक ठरतात. स्त्रीप्रधान शेतीव्यवस्थेतही जमिनी विकत घेणे पुरुषांनाच शक्य होते. कारण स्त्रिया कुटुंबासाठी अन्नउत्पादन करत असल्याने त्यांच्याकडे पैसा नसतो, तर पुरुष व्यापारी पिके काढत असल्याने किंवा मजुरी करत असल्याने पैसे साठवून जमिनी विकत घेऊ शकतात. त्यामुळे जेथे वारसाहक्काने स्त्रीला जमीन मिळते अशा समाजातही जमिनीची विक्री सुरू झाली की सर्व शेतीच जमिनीचा ताबा हळूहळू पुरुषांकडे जातो

युरोपियनांची जमिनविषयक धोरणेही जमिनीची मालकी स्त्रियांकडून पुरुषाकडे जाण्यास कारणीभूत आहेत. ऱ्होडेशियात १९५७ मध्ये झालेल्या जमीन-सुधारणांमध्ये फक्त पुरुष व विधवा स्त्रियांना जमिनीचे फेरवाटप करण्यात आले. दक्षिण आफ्रिकेत १८९८ मध्ये विवाहित स्त्रियांचा स्वतंत्र जमिनीवरील हक्क अमान्य करून प्रत्येक पुरुषाला एक जमिनीचा तुकडा देण्यात आला. यामुळे अनेक बायका असलेल्या पुरुषांनाही जमिनीचा तेवढाच तुकडा मिळाला. या बायकांना एकतर नवऱ्याच्या मालकीच्या जमिनीवर एकत्र काम करावे लागले; त्यामुळे मिळकत कमी झाली व ही जमीनही नवऱ्याच्या मृत्यूनंतर त्याच्या पुरुष-वारसाकडे गेल्याने या स्त्रियांना निर्वाहाचे काहीच साधन उरले नाही. आग्नेय आशियातही ब्रिटिश राजवटीखाली स्त्रियांची जमिनीवरील मालकी नष्ट झाली.

## मालकी हक्कातील बदल व स्त्रियांची प्रतिक्रिया

जमिनीवरील नष्ट होत जाणारी स्वतःची मालकी व त्यानुसार खालावत जाणारा दर्जा आफ्रिकन स्त्रियांनी नेहमीच बिनतक्रार स्वीकारला असे नाही. हे बदल विशेषतः युरोपियन वसाहतींच्या काळात झाले असल्याने बरेचदा या स्त्रियांच्या असंतोषाचा रोख युरोपियन वसाहतींच्या शासनाविरुद्ध होता. १९२९ व १९५९ मध्ये नायजेरियात या असंतोषाचा स्फोट झाला १९५९ च्या उठावात तर दोन हजार स्त्रियांनी मिरवणुकीने जवळच्या शहरात जाऊन दुकानांना आगी लावल्या. सर्व परकीय संस्था–परकीय शाळा, न्यायालये यासकट–बंद कराव्यात व सर्व परकीयांना त्या विभागातून हाकलून द्यावे या त्यांच्या मुख्य मागण्या होत्या. काही ठिकाणी नवीन शेती-तंत्राची सुरुवात केल्यानेही उठाव झाले. याखेरीज स्त्रिया इतर मार्गांनीही आपला विरोध नोंदवत होत्या. काही ठिकाणी

स्त्रियांच्या सल्ल्याखेरीज जमिनीचे व्यवहार केले गेले तर स्त्रिया नवऱ्यांना सोडून जाण्याची भीती असे. काही ठिकाणी वेतन घेतल्याखेरीज नवऱ्याच्या शेतावर काम अथवा घरकाम करण्याम स्त्रिया नकार देत. इतर ठिकाणी व्यापारी पिके लावण्यास स्त्रिया नवऱ्यांशी असहकार पुकारत, कारण स्वतःचे अन्न–उत्पादन वाढविण्याची त्यांची इच्छा असे. स्वतःच्या कमी कमी होत जाणाऱ्या स्थानाला स्त्रियांनी शक्य तेथे विरोध नोंदवला आहे आणि ही प्रक्रिया थांबवण्याचाही प्रयत्न केला आहे हेच यावरून स्पष्ट होते.

## स्त्री-मजूर

जमिनीची खाजगी मालकी पूर्णपणे प्रस्थापित झाल्यानंतर केवळ मजुरीवर जगणाऱ्या स्त्रियांचे प्रमाण वाढते. मजुरीवर जगणारी स्त्री नेहमी खालच्या थरातील व जातीतील असते. भारतात १९७१ च्या जनगणनेनुसार एकूण स्त्री कामकऱ्यांपैकी सुमारे ५० टक्के स्त्रिया शेतमजूर होत्या व एकूण शेतमजुरांमध्ये त्यांची संख्या ३३ टक्के होती. उत्तर भारत, पाकिस्तान येथे खालच्या जाती व आदिवासी यांची लोकसंख्या कमी असल्याने तेथे एकूण शेतमजुरांपैकी फक्त अनुक्रमे ६ टक्के व ९ टक्के स्त्रिया आहेत. हीच संख्या दक्षिण भारतात १३ टक्के आहे. याचा परिणाम स्त्रियांच्या वेतनावरही होतो. जेथे स्त्री–मजूर भरपूर उपलब्ध आहेत. तेथे त्यांचे वेतन पुरुषांपेक्षा कमी असते. उत्तर भारतात इस्लामी संस्कृतीचा प्रभाव व त्यातील पडदा पद्धती यामुळे स्त्रीने दुसऱ्याच्या शेतावर शेत-मजूर म्हणून कामास जाण्याबद्दल प्रतिकूल मत असल्याने, मजूरही शक्यतर आपल्या बायका घरीच ठेवताना दिसतात. साहजिकच स्त्री-मजुरांचा तुटवडा निर्माण होतो व त्यामुळे स्त्रियांचे वेतन बरेचदा पुरुषा-इतकेच असलेले दिसते.

निर्यातीसाठी केलेल्या उत्पादनातही स्त्रियांचा मोठा हिस्सा असतो. आशिया व आफ्रिका खंडात युरोपियन मळेवाल्यांनी जेव्हा निर्यातीसाठी उत्पादन सुरु केले, तेव्हा स्थानिक मजुरांची जी भरती केली त्याचे दोन प्रकार दिसून येतात. आशियात कुटुंबेच्या कुटुंबे भरती केली गेली. सिलोन, व्हिएतनाम येथे मळ्यातील मजुरांपैकी ५० टक्केहून अधिक, मलाया व भारतात ४० टक्केहून अधिक, व पाकिस्तान, फिलीपिन्समध्ये ३५ टक्के स्त्रिया आहेत. आशियातील पुरुषप्रधान शेतीव्यवस्थेमुळे फक्त पुरुषांना मळ्यात नोकरी देऊन शेती स्त्रियांकडे सोपवणे शक्य होत नाही. त्यामुळे सर्व कुटुंबाला मळ्यावर जागा देणे भाग पडते. यात प्रत्येक व्यक्तीने मळ्यात काम करणे मालकाला फायद्याचे ठरते, कारण त्यामुळे सर्व कुटुंबाला पोसता येईल इतके वेतन एका पुरुषाला देण्याची गरज पडत नाही. याउलट आफ्रिकन व्यवस्थेत शेती स्त्रियाच करत असल्याने फक्त पुरुषांना मळ्यात मजुरा देणे शक्य होते; कुटुंबाचा भार स्त्रियाच उचलत असतात. एकूण या दोन्ही पद्धतीत कुटुंबाला पुरेसे वेतन पुरुषाला दिले जात नाही. दोन्ही पद्धतीत स्त्रियांना घरकाम व शेती किंवा मजुरी असा कामाचा दुप्पट भार उचलावा लागतो. त्यामुळे निर्यातक्षेत्रातील स्वस्तात उपलब्ध असलेले मजूर या स्त्रियांमुळेच मिळू शकतात असे म्हणावे लागते.

ज्या स्त्रिया मजुरीसाठी बाहेर पडतात, त्या बहुधा इतर कोणतेही अकुशल काम करायला तयार असतात. आफ्रिका व आशिया खंडात या स्त्रिया बहुतेक वेळा गटागटाने कंत्राटदारांसाठी काम करतात. रस्ते, बांधकाम, मालवहातूक, ओझी वहाणे इ. कामांत स्त्रिया मोठ्या प्रमाणात दिसतात. स्त्री-मजूर या कामासाठी फायदेशीर ठरतात, कारण त्या कमी वेतन, खोटे हिशेब, वेतन कपात इ. निमूटपणे स्वीकारतात. भारतात या स्त्रिया बहुधा खालच्या जातीतील व आदिवासी असतात.

विकसनशील देशात शेतीचे आधुनिकीकरण होत असताना स्त्रियांचे स्थान काय राहील ? भांडवलाची पुरेशी जोड नसल्याने श्रमप्रधान तंत्रे वापरात राहतील. अशा वेळी स्त्री मजुरांसाठी मागणी कायम राहण्याची शक्यता आहे. परंतु स्त्रियांचा भरणा प्रामुख्याने अकुशल कामात आहे व त्यांचे वेतन पुरुषांच्या वेतनापेक्षा कमी आहे ही परिस्थिती तशीच राहील. स्त्री–पुरुषांचे शिक्षण व कसब यातील फरक दूर करण्याकरता व स्त्रीला पुरुषाबरोबरचे स्थान प्राप्त करून देण्याकरता स्त्रियांना तांत्रिक शिक्षण देण्याची फार मोठी आवश्यकता आहे; तरच आधुनिकीकरणाबरोबर स्त्रियांची जी आर्थिक–सामाजिक दृष्टचा पिछेहाट होत आहे त्याला आळा बसू शकेल.

**– ऊर्मिला जोशी**